दिनांक : .०८.२०१९

प्रति,

**माननीय केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, केंद्र सरकार**

**विषय : चर्चमध्ये होणारे हजारो कोटी रुपयांचे घोटाळे आणि तेथे वाढते लैंगिक अत्याचार पहाता त्यावर शासनाचे नियंत्रण आणण्यासाठी चर्चचे सरकारीकरण करा ....**

महोदय,

नुकतेच उत्तरप्रदेशातील चर्चसंस्थेची १ सहस्र कोटी रुपयांची प्रयागराज येथील भूमी विकल्याच्या घोटाळ्याच्या प्रकरणी पोलिसांनी चर्चच्या एका बिशपसह १६ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा नोंदवला आहे. 'इंडियन चर्च ट्रस्टीज, डायसिस ऑफ लखनौ'च्या मालकीची असलेली ही भूमी खोट्या कागदपत्रांच्या आधारे अन्य संस्थेला विकण्यात आली आहे. बिशप जॉन अगेस्ट्रीन यांच्या म्हणण्यानुसार संपूर्ण देशात अनेक सहस्रो कोटी रुपयांची भूमी विकण्यात आली आहे. या प्रकरणात बिशप पीटर बलदेव यांचा समावेश आहे. त्यांना यापूर्वी हिंदूंचे धर्मांतर करण्याच्या प्रकरणात अटक करण्यात आली होती. खोटे न्यास बनवून भूमी विकण्याचा हा देशातील सर्वांत मोठा घोटाळा आहे. चर्चमध्ये घोटाळा होण्याचे हे एक प्रकरण नसून आणखी काही प्रकरणे यापूर्वी झाली आहेत. तसेच सध्या चर्चमध्ये केवळ घोटाळे होत आहेत, असे नसून 'चर्च हे लैंगिक शोषणाचे केंद्र बनत चालले आहे', असेही गेल्या काही घटनांमधून दिसून येत आहे. तरी या अनुषंगाने लक्षात आलेल्या गोष्टी येथे देत आहोत ....

**⁕ चर्चमध्ये वाढती आर्थिक अनियमितता यांविषयी ....**

१. कोची (केरळ) येथील सायरो-मलबार चर्चच्या मालकीची ३.०६ एकर भूमी वर्ष २०१५ मध्ये कार्डीनल अलेनचेरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ९ कोटी रुपयांना विकली. या भूमीचा बाजारभाव २७ कोटी रुपये इतका होता. या व्यवहाराची बातमी सर्वत्र पसरल्यावर तिची चौकशी करण्यासाठी चर्चच्या पदाधिकाऱ्यांच्या एका ६ सदस्यीय समितीने या व्यवहारात घोटाळा झाल्याचा अहवाल दिला होता. या प्रकरणी सायरो-मलबार चर्चचे प्रमुख कार्डीनल जॉर्ज अलेनचेरी यांच्यावर गुन्हा नोंद करून त्यांची चौकशी करण्याचा आदेश केरळ उच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे.

२. वर्ष २०१७ पासून आर्थिक अनियमितता, चर्चच्या निधीचा अपवापर आणि चर्चची भूमी विकल्याच्या प्रकरणी 'चर्च ऑफ साऊथ इंडिया ट्रस्ट असोसिएशन' या संघटनेच्या कामकाजावर 'गंभीर फसवणूक अन्वेषण कार्यालया'चे ('सिरीयस फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन ऑफीस'चे) बारीक लक्ष आहे.

**⁕ चर्चमध्ये महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या गुन्ह्यांविषयी ....**

१. सप्टेंबर २०१८ मध्ये केरळमधील कोट्टयम येथील सिरो-मालाबार चर्च येथील एका ४४ वर्षीय ननने चर्चमधील बिशप फ्रॅन्को मुलक्कल याने १३ वेळा बलात्कार केल्याचा आरोप केला. केरळ पोलिसांनी आरोपी मुलक्कल याला गुन्हा दाखल केल्यानंतर तब्बल ७५ दिवसांनी अटक केली.

२. जून २०१८ मध्ये केरळमधील कोट्टयममधील एका चर्चमधील ५ पाद्रींनी एका महिलेचे गेल्या काही वर्षांत ३८० वेळा लैंगिक शोषण केले. उपलब्ध माहितीनुसार या प्रकरणी पोलिसांनी एका पाद्र्याला अटक केली असून अन्य पाद्री पसार आहेत.

वरील उदाहरणे केवळ प्रातिनिधीक असून गेल्या काही वर्षांत चर्चमध्ये महिलांचे लैंगिक शोषण

होण्यासंबंधी अनेक प्रकरणे सातत्याने घडत आहेत. चर्च संस्थांचा एकूण सर्व कारभार संशयास्पद आहे. याचसमवेत अनेक चर्चना विदेशातून हिंदूंना धर्मांतरित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीही येत असल्याचेही अनेक वेळा उघड झाले आहे, तसेच भारतातील चर्च संस्थेकडे मोठ्या प्रमाणात जमीन आणि संपत्ती असून त्यामध्ये गैरव्यवहार होत असतील; पण ते फादर अन् चर्च यांच्या दबावामुळे पुढे येत नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**⁕ त्यामुळे या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत .....**

१. हिंदूंच्या मंदिरांचे सुव्यवस्थापन आणण्याच्या नावाखाली सरकारने मंदिरांचे सरकारीकरण केले आणि मंदिरांवर नियंत्रण मिळवत शासकीय विश्वस्त नेमले. त्याप्रमाणेच चर्चच्या संदर्भात होत असलेले घोटाळे, गैरव्यवहार लक्षात घेता देशभरातील सर्व चर्चचेही सरकारीकरण करण्यात यावे अन्यथा मंदिरांचे सरकारीकरण रहित करावे.

२. चर्चमध्ये होत असलेले घोटाळे आणि अन्य सर्व प्रकारच्या गुन्हेगारी प्रकरणांची चौकशी करण्यासाठी एक विशेष आयोग नेमावा.

३. चर्चमध्ये होणाऱ्या घोटाळ्यांचे सर्व खटले जलदगती न्यायालयात चालवावेत अन् सर्व आरोपींना तात्काळ शिक्षा होण्यासाठी केंद्र शासनाने प्रयत्न करावेत.

४. चर्चच्या ताब्यात असलेल्या सहस्रो एकरच्या जमिनी शासनाने ताब्यात घेऊन त्यांचा उपयोग जनहितासाठी करावा.

आपला विश्वासू,

संपर्क :